**Scholarly Research Journal for Humanity Science & English Language,**
***Online ISSN 2348-3083, SJ IMPACT FACTOR 2017: 5.068, www.srjis.com***
*PEER REVIEWED & REFERRED JOURNAL, APR-MAY, 2019, VOL- 7/33*

# शिक्षक मूलभूत मानवी मुल्यासंबंधी बांधिलकी एक अभ्यास

**प्रकाश अ. जगताप , Ph. D.**

*टिळक शिक्षण महाविद्यालय, पुणे*

**Abstract**

*मुल्यशिक्षण हा एक महत्त्वाचा विषय, मुल्यांची निर्मिती ही शिक्षणातूनच होते आणि शिक्षण प्रक्रियेतील शिक्षक हा एक महत्त्वाचा घटक आहे. म्हणून शिक्षक निष्ठावान असावा विविध प्रकारच्या बांधिलकी जोपासाव्यात मूलभूत मानवी मुल्या संबंधीची बांधिलकी जोपासावी. मुल्याधिष्ठित शिक्षकवर्तन असावा. अध्यापन व्यवसायमुल्ये, संविधानारत्मक मुल्ये, विविध शैक्षणिक आयोग, धोरणांनी सांगितलेली मुल्ये, वैश्विक मानवी मूल्य या मुल्यांचा अभ्यास करावा, समजून घ्यावीत आणि वर्तन आणि विविध उपक्रमातून आणि अध्ययनअध्यापनातून मुल्यांची रूजवणूक शिक्षकांनी करावी. मूलत: शिक्षक मूलभूत मानवी मुल्यासंबंधी बांधिलकीच्या बावत जागरूक आहे का?संविधानात्मक मुल्य, शैक्षणिक धोरणांनी सांगितलेली मुल्ये, वैश्विक मानवी मूल्य विद्यार्थ्यांमध्ये रूजवण्यासाठी प्रयत्नशील असतात का? याचा प्रस्तुत संशोधन विचार केला आहे, प्रस्तुत संशोधनाच्या दृष्टीने आवश्यक माहिती प्रश्नावलीद्वारे संकलित करून विश्लेषण केले आहे.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना :**

एकविसाव्या शतकातील शिक्षक हा ज्ञानार्धिष्ठित, तंत्रज्ञानाधिष्ठित, क्षमताधिष्ठित त्याचप्रमाणे निष्ठाधिष्ठित असणे ही काळाची गरज आहे. व्यावसायिक क्षमतांच्या बरोबरीने शिक्षकांजवळ काही निष्टा, बांधिलकीची भावना असावी. या निष्टा शिक्षकाला कार्यप्रवृत्त करण्यासाठी उपयुक्त असतात.

आधुनिक काळात नितिमुल्यांची मोठ्या प्रमाणावर घसरण झालेली आपणास दिसते. अशा वेळी शिक्षकांची मूलभूत मूल्या संबंधीची बांधिलकी हे संस्कृती संरक्षणाचे, संवर्धनाचे व सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्याचे काम करते. त्यामुळे प्रत्येक शिक्षकाने मूलभूत मानवी मूल्यासंबंधी बांधिलकीची भूमिका स्वीकारून कार्यरत असायला हवे.

मुल्यांचे विविध स्त्रोत आहेत. यात प्रामुख्याने कुटुंबसंस्था, समुदाय, समाज, उद्योग व्यवसाय, भाषा, साहित्य, कला, क्रीडा, धर्म, संतपरंपरा, प्रवोधन, विज्ञानातील शोध, भारतीय स्वातंत्र्याचा लढा, राष्ट्र, राष्ट्रध्वज, राष्ट्रमुद्रा, राष्ट्रीय प्रतीके इ. हे सर्व मुल्यांचे स्त्रोत आहेत या सर्व स्त्रोतांचा शिक्षकाने अभ्यास केला पाहिजे. या विषयी जागृक असायला हवे, निष्ठावान असायला हवे.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**मूलभूत मानवी मूल्यासंबंधी बांधिलकी :**

मूल्यसंवर्धन, मूल्यविकास आणि मूल्यशिक्षण या विषयी नेहमी चर्चा होते. विविध शैक्षणिक आयोग, धोरणांनी मूल्य शिक्षण, मूल्य रूजवण यावर भर दिला. त्यानुसार शाळा महाविद्यालयातून मूल्यशिक्षण दिले जाते. मूल्यशिक्षणासाठी आजपर्यंत वेगवेगळ्या पद्धतींचा वापर करण्यात आला. यात शिक्षकाची भूमिका महत्त्वाची असते. शिक्षकाची स्वत:ची मूल्यांवर श्रद्धा असावी, विश्वास असावा. शिक्षकाने स्वत: मूल्याधिष्ठित आचरण करून विद्यार्थ्यांमध्ये शब्दांद्वारे व त्याचबरोबर वर्तन व कृतींद्वारे मूल्यांची रूजवणूक करावी. त्याचप्रमाणे सार्वत्रिक मूल्य अंगीकारावीत. शिक्षकाने आपल्या अध्यापन व्यवसायाची मूल्ये समजून घ्यावीत, भारतीय राज्यघटनेमध्ये नमूद केलेली आणि मूलभूत अधिकार व कर्तव्य यांच्याशी निगडीत असणारी मूल्ये समजून घ्यावीत व विविध शैक्षणिक आयोग, धोरणांनी सांगिंतलेली मूल्य अभ्यासक्रम, अध्ययन अध्यापन आणि शिक्षक वर्तनातून प्रतिबिंबित व्हावी आणि शिक्षकात मूल्यासंबंधी एक सकारात्मक दृष्टीकोन असावा आणि मुल्याधिष्ठित शिक्षणासाठी प्रयत्नशील राहून, मूल्यनिष्ठेने कार्य करावे.

**महत्त्व :**

मूलभूत मानवी मुल्यांप्रति शिक्षकांमध्ये बांधिलकी असणे महत्त्वाचे आहे. प्रत्येक शिक्षकांने मूल्याधिष्ठित स्वत:च शिक्षक म्हणून वर्तन ठेवणे गरजेचे आहे. शिक्षक मूलभूत मानवी मूल्य मानणारा असावा. संविधानीक मूल्य माणणारा शिक्षक हा ख-या अर्थाने मूल्याधिष्ठित पिढी घडविण्यामध्ये मोठी भूमिका पार पाडू शकतो. प्रस्तुत संशोधन त्या अनुषंगाने महत्त्वाचे आहे. शिक्षकांच्या ठिकाणी मानवी मुल्यासंबंधी किती प्रमाणात बांधिलकी आहे. त्याबाबत शिक्षकांमध्ये जागृकता आहे का ? याचा शोध घेण्यासाठी प्रस्तुत संशोधन महत्त्वाचे आहे. मूलभूत मानवी मूल्य शिक्षकात वृद्धींगत होण्यासाठी प्रस्तुत संशोधनातून महत्त्वाच्या शिफारशी करता येईल. मूलभूत मानवी मूल्यासंबंधीची बांधिलकी विषयी शिक्षकात सकारात्मक दृष्टीकोन निर्माण होईल.

**उद्दिष्टे :**

१) शालेय शिक्षकांच्या मूलभूत मानवी मूल्यासंबंधी बांधिलकीचा शोध घेणे.

२) शालेय शिक्षकांच्या मूलभूत मानवी मूल्यासंबंधी बांधिलकेच्या जागृकतेचा अभ्यास करणे.

**संशोधनाची व्याप्ती ः**

१) प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील शिक्षकांपुरते व्याप्त आहे.

२) प्रस्तुत संशोधन पुणे शहरातील माध्यमिक शाळांपुरते व्याप्त आहे.

३) प्रस्तुत संशोधन माध्यमिक शिक्षकांच्या मुलभूत मानवी मुल्यासंबंधी बांधिलकी पुरते व्याप्त आहे.

**मर्यादा** :

१) संशोधनाचे निष्कर्ष हे शिक्षकांनी माहिती संकलन साधनात दिलेल्या प्रतिसादवर अवलंबून राहील.

२) सदर संशोधन मराठी माध्यमांच्या शिक्षकांशी संबंधित आहे.

**संशोधन पद्धती** :

प्रस्तुत संशोधनाचा अभ्यास करण्यासाठी वर्णनात्मक संशोधनातील शालेय सर्वेक्षण या प्रकारची निवड करण्यात आली होती.

**संशोधन साधने** :

प्रस्तुत संशोधनामध्ये शिक्षक बांधिलकी शलाका या साधनाचा वापर केला आहे.

**नमुना निवड पद्धत** :

प्रस्तुत संशोधनात संभाव्यतेवर आधारित नमूना निवड पद्धतीतील सुगम यादृच्छिक पद्धती व त्यातील लॉटरी पद्धतीने नमूद निवड केली आहे.

**संख्याशास्त्रीय तंत्र** :

सदर संशोधनात शिक्षक बांधिलकी शलाकेद्वारे माहिती संकलित केली त्या माहितीचे संख्याशास्त्रीय अर्थनिर्वचनासाठी शेकडेवारीचा वापर केला.

**निष्कर्ष** :

१) लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या संकल्पनांना प्रोत्साहन देण्यासाठी शिक्षक अध्यापनातून व विविध कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन करण्याचे प्रमाणे अल्पप्रमाणात दिसून आले.

२) शाळेत अभ्यासपूरक उपक्रमातून संवेधानिक कायदे, मूल्ये, अधिकार आणि कर्तव्य या विषयी संवेदनक्षमता वाढवण्याच्या प्रयत्नाचे प्रमाण अल्प प्रमाणात दिसून आले.

३) शाळेत अभ्यासपूरक उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मानवी मूल्ये रूजविण्याचे प्रयत्नाचे प्रमाण समाधानकारक दिसून आले.

४) श्रमप्रतिष्ठा मुल्य विद्यार्थ्यात विकसित करण्यासाठीचे प्रयत्न प्रमाण चांगले दिसून आले.

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

५) वैज्ञानिक दृष्टीकोन मूल्य रूजविण्याचे प्रमाण समाधान कारक दिसून आले.

६) वक्तशीरपणा मूल्य रूजविण्यासाठी स्वत: पासून सुरूवात करण्याचे प्रमाण चांगले दिसून आले.

७) सजन्यशीलता, संवदेनशीलता मूल्ये शिक्षक वर्तनातून शाळेत रूजविण्याचे प्रमाण चांगले दिसून आले.

८) स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय ही राज्य घटनेतील मूल्य रूजविण्यासाठी शिक्षक जाणीवपूर्वक प्रयत्न करण्याचे प्रमाण अल्प प्रमाणात दिसून आले.

९) विद्यार्थ्यात गाभाघटक रूजविण्याचे प्रमाण चांगले दिसून आले.

**शिफारशी** :

१) शाळेत मूल्य शिक्षणावर आधारित कार्यशाळेचे आयेजन करावे.

२) संविधानिक कायद, मूल्य, अधिकार, कर्तव्य या विषयी अभ्यासपूरक उपक्रमांचे आयोजन करावे.

३) सजन्यशीलता, संवदेनशीलता मूल्य विकासनासाठी शिक्षक व विद्यार्थ्यांनी अनाथालय, वृद्धाश्रम या ठिकाणी भेट द्यावी.

४) संविधाना दिन शाळेत साजरा करावा.

५) संविधानाच्या चकटीत राहुन शिक्षक मुख्याध्यापक यांनी कर्तव्य पार पाडावे.

६) मूलभूत मानवी मूल्य या संबंधी शिक्षक बांधिलकी या विषयावर शाळेत कार्यशाळा आयोजित करावी.

**संदर्भ** :

*भिंताडे वि. रा. (२००६)शैक्षणिक संशोधन पद्धती, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.*
*मुळावसकर स, मुळावकर क (२००५) मूल्यशिक्षण : सुसंवाद, विद्या प्रकाशन नागपूर.*
*मोरे च. भिलेगांवकर सं. (२००९) शिक्षक शिक्षण, नित्यनूतन प्रकाशन, पुणे.*

*Copyright © 2017, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*